दैनिक
दैनिक सत्यशोधक बाणाचे वृतपत्र
# सेवाशक्ती टाईम्स
https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com
बुलडाणा ● वर्ष:- 3 रे ● अंक:- २३० ● पाने:- ४ ● किंमत:- २ रुपये ● RNI:- MAHMAR/२०२२/८७८८४ ● रविवार १९ ऑक्टोबर २०२५

## मनसेला सोबत घेण्याचा प्रस्ताव !

### राऊतांचा काँग्रेसवर निशाणा, म्हणाले, “अजून ते स्वातंत्र्य चळवळीच्या काळातच”

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**



मुंबई : महाविकास आघाडीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना सोबत घेण्या बाबतच्या चर्चांना जोर असतानाच, शिवसेना (उबाठा) खासदार संजय राऊत यांनी मोठं विधान केलं आहे. काही दिवसांपूर्वी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ मनसेला सोबत घेण्यावरुन काँग्रेस अन् मविआला नव्या भिडूची गरज नसल्याचे म्हटलं होतं. त्यानंतर मनसेला सोबत घेण्याबाबत सकपाळ यांनी आमच्याकडे कोणताही प्रस्ताव नाही, असे म्हटले होते. त्यावर प्रतिक्रिया देताना संजय राऊत यांनी मनसेकडे याबाबत अजून प्रस्ताव दिलेलाच नसल्याचे म्हटलं.राज ठाकरे यांना महाविकास आघाडीत घेण्याच्या चर्चांना गेल्या काही दिवसां पासून राजकीय वर्तुळात प्रचंड गती मिळाली आहे. राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांची वारंवार भेट घेतली आहे. अलीकडेच ते उद्धव ठाकरे यांच्या निवास स्थानी मातोश्रीवर जाऊन त्यांना भेटले होते. या भेटी केवळ कौटुंबिक स्वरूपाच्या आहेत असे दोन्ही बाजूंकडून सांगितले जात असले तरी, आगामी राजकीय समीकरणे आणि निवडणुकांच्या पार्श्व भूमीवर मनसेला महाविकास आघाडी मध्ये घेण्यासाठी अंतर्गत चर्चा सुरू असल्याची कुजबूज आहे. संजय राऊत यांच्या आजच्या विधानामुळे मनसेला सोबत घेण्याचा निर्णय उद्धव आणि राज ठाकरे यांच्या पातळीवर जवळजवळ निश्चित झाला आहे. मात्र काँग्रेसने याबाबत कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यामुळे आता काँग्रेस पक्ष या प्रस्तावावर काय भूमिका घेतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. काँग्रेस-राष्ट्र वादीची एकत्र येण्याबद्दल नका रात्मक भूमिका नाही - संजय राऊत "शरद पवार आमच्या महाराष्ट्राची अस्मिता आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात काँग्रेसचे अनेक नेते उपस्थित होते. आज पुन्हा एकदा या महाराष्ट्रात संयुक्त महा राष्ट्राच्या लढ्या सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्रावर आक्रमण सुरू आहेत. ते पाहता प्रत्येक मराठी नेत्याची जबाब दारी आहे आणि ती प्रत्येकाने पाळली पाहिजे. राष्ट्रवादी आणि काँग्रेस मधील महाराष्ट्रातील पुढारी या लढाईत कुठेच मागे राहणार नाहीत. महानगर पालिकेतील जागा वाटप फक्त हाच प्रश्न नाहीये. मतदार यादीतील घोटाळा महा राष्ट्रातील माणसांची पीछेहाट करण्या साठी केलेला आहे. तसेच यापैकी एकाही पक्षाने आम्ही एकत्र येण्याबद्दल नकारात्मक भूमिका घेतलेली नाही," असंही संजय राऊत म्हणाले.

**त्या पक्षाचा प्रश्न असतो.!**

संजय राऊत यांनी यावेळी काँग्रेसच्या कार्यपद्धतीवर आणि इतिहासावर बोट ठेवले. ₹ पण अजून हा प्रस्ताव दिलेलाच नाही. अशा प्रकारचा प्रस्ताव हा त्या त्या पक्षाचा प्रश्न असतो. त्यांचा (काँग्रेस) राष्ट्रीय पक्ष आहे. त्यांच्या विविध कमिट्या असतात. आमच्याकडे किंवा राज ठाकरेंकडे तशा प्रकारची पद्धत नाही. आम्ही लगेच निर्णय घेतला आणि पुढे गेलो. तो खूप मोठा पक्ष आहे. स्वातंत्र्य चळवळीतील पक्ष आहे आणि आजही तो त्याच काळात वावरत आहे,₹ असं संजय राऊत म्हणाले. म्हणजेच निर्णय घेण्यासाठी काँग्रेसला खूप वेळ लागतो, असा सूचक अर्थ त्यांनी व्यक्त केला.

## 'त्या' दरिंदे जरांगे पाटलाने ओबीसी-मराठ्यात अंतर पाडलं - भुजबळ



**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

बीड : बीडमध्ये ओबीसी नेत्यांची महाएल्गार सभा पार पडली, या सभेमध्ये बोलताना छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. मराठा समाजाला आमचा विरोध नाही. मघाशीच धनंजय मुंडे यांनी देखील सांगितलं. मराठा समाज आणि आमच्यात अंतर पडलं, हे अंतर अंतरवालीच्या दरिंदे पाटलांमुळे पडलं. मराठा समाजाला वेगळ्या आरक्षणाला आम्ही पाठिंबा दिला आहे, अशा शब्दात भुजबळ यांनी जरांगे पाटील यांच्यावर निशाणा साधला आहे.बीडमध्ये ओबीसी महाएल्गार मोर्चानंतर आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी सुरुच आहे. त्याचे पडसाद आजही उमटले. मंत्री छगन भुजबळ विरुद्ध मनोज जरांगे पाटील आणि काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यात आज सामना रंगला. त्यात वडेट्टीवार यांचे तर वेगळेच दुःख दिसले. जरांगे आणि आता भुजबळ हे आपल्यावर टीका करत असल्याचे ते म्हणाले. तर दुसरीकडे मंत्री छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटलांवर थेट हल्ला केला. कालच्या बीड येथील सभेवर बोलताना जरांगे पाटील यांनी छगन भुजबळ हे दोन समाजात तेढ निर्माण करत आहेत. ते दंगल भडकवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला. गृह मंत्रालयाने भुजबळांचा जामीन रद्द करुन त्यांना अटक करण्याची मागणी जरांगे यांनी केली होती. आज त्यावर भुजबळांनी थेट प्रति क्रिया दिली.खरे म्हणजे तर या जरांगेंनाच अटक करायला हवे. बीडची आमदारांची घरं कुणी जाळली. हॉटेल्स कुणी जाळली. बीड पेटवलं कुणी, लोक प्रतिनिधींच्या, जयदत्त क्षीरसागरांच्या लहान मुलं धुरात गुदमरत होती. त्यावेळी मुस्लीम समाजाच्या तरुणांनी मागील भितीवरून उड्या मारून या मुलांना वाचवलं. अरे, कारवाई तर तुझ्यावर झाली पाहिजे होती रे. ज्या पद्धतीने तू सांगतोस की, जो आपल्या विरोधात जाईल. त्यांना चोपून काढा अशा भाषेत ते बोलत आहेत.जे विरोधात जातील त्यांचे सर्व उमेदवार पाडा. हे तुम्ही बोलतायेत. मारामारीची भाषा तुम्ही केली आणि आज नाभिक समाजाची लोकांची डोकं तुम्ही फोडली. नवनाथ वाघमारेंची गाडी तुम्ही जाळली. लक्ष्मण हाकेंच्या कार्यकर्त्याला तर तुम्ही मार मार मारला. का? तर तो हाकेंसोबत राहतो म्हणून. मरता मरता तो वाचला. तुम्ही चिथावणी देत आहे. तुम्ही हॉस्पीटलमध्ये असता. कोणता आजार तुम्हाला झाला हे देवालाच माहिती आहे, असा टोला भुजबळांनी लगावला. तो कायम माझ्यावर काही तरी बोलतो, म्हणून मी त्याच्यावर बोललो. तो बोलत राहील आणि आम्ही किती दिवस गप्प राहायचं असा सवाल छगन भुजबळांनी मनोज जरांगेंच्या टीकेवर केली.

**नेमकं काय म्हणाले भुजबळ?**

राज्यात अतिवृष्टी झाली, महापूर झाला तरी तुम्ही इथे आला, ओबीसींची एकजूट दाखवली त्याबद्दल तुम्हाला लाख लाख धन्यवाद . दिवाळी आली, पण कशा शुभेच्छा देऊ? आमच्या ७५ लोकांनी आत्महत्या केली आहे, आरक्षण गेलं म्हणून त्यांनी आत्महत्या केली. मग कशी दिवाळी साजरी करायची आहे? मराठा समाजाला आमचा विरोध नाही. मघाशीच धनंजय मुंडे यांनी सांगितलं. मराठा समाज आणि आमच्यात अंतर पडलं, हे अंतर अंतरवालीच्या दरिंदे पाटलांमुळे पडलं, असा घणाघात यावेळी भुजबळ यांनी जरांगे पाटील यांच्यावर केला आहे.

**मराठा समाजाचे ५८ मोर्चे निघाले!**

मराठा समाजाला वेगळ्या आरक्षणासाठी आम्ही पाठिंबा दिला. मराठा समाजाचे ५८ मोर्चे निघाले, जाट, गुर्जर यांचे मोर्चे निघाले. मोदींनी ईडब्ल्यूएस आणलं आणि सांगितलं काही घटक शिक्षणात, आर्थिकदृष्टीने मागे आहेत, पण सामाजिकदृष्टीने मागे नाहीत, त्यामुळे त्यांना रिझर्व्हेशनमध्ये जागा देता येत नाही. एका ईडब्ल्यूएसमध्ये ७० पैकी ८ मराठा समाजाचे लोक निवडून आले, तरी म्हणतात मराठा समाजाला आरक्षण हवं, आम्ही म्हटलं द्या. आता म्हणतात ओबीसीतच पाहिजे, कोण म्हणतंय, ज्याचा अभ्यास नाही, असा टोलाही यावेळी भुजबळ यांनी जरांगे पाटील यांना लगावला आहे.

**पण ६० टक्के आम्ही, ५० टक्के आम्ही!**

आरक्षण सामाजिक दृष्टया मागास आहेत त्यांच्यासाठी आहे. आरक्षण म्हणजे गरिबी हटावचा नारा नाही. ५४ टक्के ओबीसी ३७४ जाती, १३ टक्के दलित बांधव, ७ टक्के आदिवासी, ३ टक्के ब्राह्मण, त्यानंतर मुस्लिम आणि मग शिल्लक राहतात ते मोजा, तो मराठा समाज आहे. पण ६० टक्के आम्ही, ५० टक्के आम्ही, पाच कोटी मुंबईत आणणार, सरकारने नरमाईने घेतलं म्हणून दादागिरी दिसली, पोलिसांना सांगितलं असतं कामाला लावा, एक रात्र थांबायला पाहिजे होतं, पोलिसांनी रस्ता साफ केला होता, हे कोण होते? मराठा समाजाचे लोक नाही. हे दारूवाले, वाळूचोर हे त्याचे लोकं होते, दरिंदे पाटलाने आणलेले लोक, असं यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे.

**ओबीसींसाठी वेगळा मतदारसंघ का नाही?**

दलित, आदिवासी इतरांसाठी राखीव मतदार संघ आहे. मग ओबीसीसाठी वेगळा मतदार संघ का नाही ? असा सवाल भुजबळांनी केला. त्यांच्या या नवीन मागणीनी राजकीय विश्लेषकांचे लक्ष वेधले आहे. जरांगे माझ्या मतदार संघात येऊन गेले. पण तरीदेखील माझ्या मतदार संघात काहीच फरक पडला नाही, असा टोलाही भुजबळांनी जरांगे पाटलांना लगावला.

## गर्लफ्रेंडचा मोबाईल हॅक केला, अश्लील व्हिडीओ अन् आईवडिलांना धमक्या, २९ वर्षीय तरुणीवर प्रियकरानेच केला बलात्कार

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**




कल्याण : दोघ एकमेकांच्या प्रेमात पडले. त्याने तिला लग्न करण्याचे वचन दिले. पण, नंतर त्याच्यातील नराधम जागा झाला आणि सुरू झाले अत्याचाराचे सत्र. कल्याण मधील खडकपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका २९ वर्षीय तरुणीवर तिच्याच प्रियक राकडून ब्लॅकमेल करत अनेकवेळा बलात्कार करण्यात आला. या नराधमाने तिचा मोबाईल हॅक केला. तिच्या सोबतचे आक्षेपार्ह व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी तिच्या आईवडिलांना आणि भावाला दिली. राजकीय पक्षाचा पदाधिकारी असलेल्या आरो पीने गुन्हा दाखल करु नका म्हणून पीडिता आणि तिच्या कुटुंबालाही धमक्या दिल्या. पण, प्रकरण उजेडात आले आणि आरोपी विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. खडकपाडा पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी फरार आहे. पोलीस आरोपीचा शोध घेत आहे. तो एका राजकीय पक्षाचा पदाधि कारीही आहे. राजकीय वजन वापरत त्याने पीडिते विरोधातच चोरीचा गुन्हा दाखल करून दबाव आणला होता. खडकपाडा पोलिसांनी सांगितले की, २९ वर्षीय तरुणी आणि आरोपी यांच्यात मागील काही काळापासून प्रेमसंबंध होते. आरोपीने तिला लग्न करण्याचे वचनही दिले होते. त्यांच्यात अनेकदा शरीरसंबंध राहिले आहेत. आरोपीने तरुणीचा मोबाईल हॅक केला. तो तिच्यावर पाळत ठेवू लागला. त्यानंतर त्याने तरुणीसोबतचे व्हिडीओ, फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत तिच्या आईवडील आणि भावालाही ब्लॅकमेल करणे सुरू केले. त्याने व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत तरुणीवर बलात्कार केला. आईवडील आणि भावाला जीवे मारण्याची धमकी एकदा त्याने भेटायला बोलवलं. त्यावेळी तरुणीच्या हाती त्याचा मोबाईल लागला. त्यात इतर मुलींसोबत चेही अश्लील व्हिडीओ तिला दिसले. व्हिडीओ बघितल्यानंतर तरुणी हादरली. तिने त्याचा मोबाईल स्वतः कडेच ठेवला. आरोपी चिडला. नंतर तो थेट तिच्या घरी गेला आणि तरुणीच्या आईवडील व भावाला जीवे मारण्याची धमकी दिली. इतकंच नाही तर तरुणीने माझा मोबाईल चोरल्याचा गुन्हा त्याने पोलिसांना राजकीय वजन वापरून दाखल करायला लावला. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणात तरुणीची चौकशी केली. त्यावेळी तिने झालेल्या अत्या चाराची आणि आरोपी कडून दिल्या जात असलेल्या धमक्याची कहाणी सांगितली. त्याच्या मोबाईल मधील व्हिडीओही पोलिसांना मिळाले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

## सण काळवंडला... बाप, मुलगा आणि भाविकांसह 9 ठार, तर आजोबा, मावशी गंभीर जखमी; राज्यात काळजाचा ठोका चुकवणारे दोन अपघात

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

नंदुरबार : दिवाळीला सुरुवात झाली आहे, आज धनत्र योदशीचा सण आहे. सणानिमित्त राज्यात, लोकांमध्ये उत्साहाचं वातावरण असून फराळ, खरेदी, फटाके विकत घेणं यामुळे मोठी गर्दी असून सगळीकडे आनंदी वातावरण आहे. मात्र याच समाला, आनंदाला गालबोट लागलं आहे, त्याच कारण म्हणजे राज्यात 2 भीषण अपघातांमध्ये एकूण 9 जण ठार झाले आहेत. नंदुरबार- अस्तंबा यात्रेवरून परत येणाऱ्या भाविकांवर काळाने घाला घातला आहे, भाविकांच्या पिकअप ट्रकला अपघात होऊन 6 जण मृत्यूमुखी पडले. तर दुसरीकडे समृद्धी महामार्गावर वाशिम जवळ इनोव्हा कारच्या भीषण अपघाता झाला असून त्यात तिघांचा जागीच मृत्यू झाला. या दोन्ही अपघातांमुळे हळहळ व्यक्त होत असून अनेक जण जखमी आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.सणासुदीच्या काळात



अपघातांचे सत्र सुरूच असून अनेक निष्पाप नागिरकांना जीव गमवावा लागल्याचे समोर आले आहे. नंदूरबार अस्तंबा यात्रेवरून परत येणाऱ्या भाविकांवर काळाने झडप घातली. यात्रेहून परत येणाऱ्या भाविकांच्या पिकअप गाडीला अपघा झाला. चांदशैली घाटात वाहन चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाला, त्यामध्ये 6 भाविकांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.तर 10 पेक्षा अधिक भाविक गंभीर जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.अपघात स्थळी भयानक दृश्य असून तिथे मदत कार्य सुरु आहे. जखमींना तळोदा उप जिल्हा रुग्णालयात हलवण्याची कार्यवाही सुरु असून तिथे उपचार करण्यात येतील. अपघाताचे वृत्त समजताच पोलीस यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली.

# खिशात शंभर रुपये, डोळ्यात स्वप्न अल्ताफ शेख यांची कर्मयोगी वाटचाल!



सोलापूर जिल्ह्याच्या मातीतील एक साधा मुलगा, खिशात केवळ शंभर रुपये, पण डोळ्यात प्रचंड स्वप्ने! हा मुलगा म्हणजेच अल्ताफ दादासाहेब शेख— स्वप्न बघायला पैसे लागत नाहीत; पण स्वप्नांचा पाठलाग करावा लागतो ही गोष्ट अल्ताफ यांनी सत्यात उतरून दाखवली . आज पुण्यात यशाच्या शिखरावर पोहोचलेला, नॅशनल आणि इंटरनॅशनल पुरस्कार विजेता, गिनीज बुक वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर, मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीत ठसा उमटवणारा नावाजलेला दिग्दर्शक, लेखक, संगीतकार आणि निर्माता! "जिंदा रहूँगा तब भी चर्चा में रहूँगा,और मरने के बाद भी चर्चा में रहूँगा" या त्यांच्याच शायरीतून त्यांचं ध्येयवेड दिसतं. त्यांच्या मुलाखतीतून जाणून घेऊया त्यांचा थक्क करणारा यशाचा प्रवास.

पत्रकार: "शंभर रुपयांतून सुरू झालेली गाथा" काय सांगाल आपल्या बालपण आणि संघर्षाबद्दल!

अल्ताफ शेख: लहान पणा पासूनच माझ्या मनात लेखक-दिग्दर्शक होण्याचं स्वप्न होतं. शाळेत असताना 'माझं स्वप्न' या विषयावर मी लिहिलेल्या निबंधातच मी सिनेसृष्टीत करिअर करणार असल्याचं जाहीर केलं. शिक्षकांनी फटकारलं, वडिलांनी काळजी व्यक्त केली, पण माझं ध्येय मात्र अढळ राहिलं.पुढे जबाबदाऱ्या वाढल्या, अवघे १०० रुपये घेऊन गाव सोडलं, पुण्यात बुटिक सुरू केलं; पण मनातला कलाकार जिवंत राहिला. २०१० मध्ये शून्यातून प्रवास सुरू केला—कधी फुकट कपडे शिवले, कधी प्रोडक्शनचं काम केलं, कधी आर्ट डायरेक्शन, तर कधी डिझायनिंग. आणि तिथूनच घडला संघर्षाचा पहिला अंक.

पत्रकार: आपला नुकताच सुपरहीट ठरलेल्या चित्रपटाविषयी थोडं सांगा.

अल्ताफ शेख: २५ ऑक्टोबर रोजी चित्रपट 'कर्मयोगी आबासाहेब' जगभर प्रदर्शित झाला. दिवंगत माजी कॅबिनेट मंत्री गणपतराव देशमुख ऊर्फ आबासाहेब यांच्या जीवनावर आधारित हा चित्रपट केवळ एक बायोपिक नाही, तर समाजकारणाला नवी दिशा देणारी प्रेरणागाथा ठरला. जगभर सुपरहिट झाला. 'वेडा बीएफ' ते 'कर्मयोगी आबासाहेब' आता "एट पोस्ट बिहाली" पर्यंत...

पत्रकार: आपल्या चित्रपट निर्मितीच्या प्रवासाविषयी थोड जाणून घ्यायचं आहे.

अल्ताफ शेख: पूर्वी मी 18 पेक्षा जास्त चित्रपट लोकांच्या नावावर लिहिले. त्याच्या बदल्यात फक्त पैसाच भेटला; पण स्वतःच नाव झालं नाही. २०१८ मध्ये 'वेडा बीएफ' या चित्रपटाद्वारे मी दिग्दर्शन क्षेत्रात दमदार पाऊल टाकलं. हा सिनेमा सलग तीन आठवडे रंगमंचावर गाजला. खरी ओळख ही वेडा बीएफ चित्रपटापासून भेटली. त्यानंतर 'लोरी' या हिंदी चित्रपटात संगीत दिग्दर्शन केलं. मग हा प्रवास धारावी कट्टा, कम ऑन विष्णू, ब्रेक डाऊन, त्यातच एक मोठं स्वप्न साकारलं आहे— 'कर्मयोगी आबा साहेब'. हा केवळ एक चित्रपट नाही; तो समाजकारण, आदर्श नेतृत्व आणि संघर्षातून घडलेल्या वारशाची कहाणी आहे. देश, विदेशातील प्रेक्षकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. आज "एट पोस्ट बिहाली" ही फिल्म धमाकेदार एंट्रीत प्रदर्शित होत आहे व अनेक फिल्म्स अंडर शूटींग चालु आहेत. जागतिक मानाचा प्रवास...

पत्रकार: सर, आपल्याला अनेक जागतिक, राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. तर या यशाविषयी!

अल्ताफ शेख: हो! हे सर्व प्रेक्षकांच्या बळावर झालं आहे. पुरस्कारां विषयी म्हणाल तर, अँम्सटरडॅम लिफ्ट - ऑफ, क्राउनवूड आंतर राष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शन, "गिनीज बुक आणि हाई रेंज ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड", लंडन बुक ऑफ रेकॉर्ड, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली, जगप्रसिद्ध कान्स फिल्म फेस्टिव्हलच्या Marché du Film (मार्शे दु फिल्म) मार्केटमध्ये उपस्थितीची नोंद झाली. बेंगलोर- इंटरनॅशनल पॅनोरामा फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, थर्ड आय एशियन फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, यु.के. सिडनी - लिफ्ट ऑफ फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, लाहोर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, स्विडन- फायनलिस्ट फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, क्राऊन वूड इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, भारत नॅशनल ऍवॉर्ड, स्पेशल ज्युरी ऍवॉर्ड, Tamizhagam इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, गोल्डन लायन फिल्म फेस्टिव्हल ऍवॉर्ड, वेस्टन युरो फिल्म फेस्टिवल (बेस्ट डायरेक्टर) दादासाहेब फाळके पुरस्कार इत्यादी मानाचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय 50 हून अधिक पुरस्कार मिळाले आहेत. समाजाला दिशा देणारा सिनेमॅटिक योद्धा...

पत्रकार: आपल्या या जीवन प्रवासात काही लोकं असतील जे आपल्या पाठीशी असतील अशांविषयी आपल्या भावना!

अल्ताफ शेख: "जीवनात मी कधी हरलो नाही, फक्त प्रयत्न सुरू ठेवले. माझ्या मागे कुटुंबाचा, विशेषतः भाऊ सय्यद शेख आणि फराना शेख यांचा भक्कम पाठिंबा होता. आज मी जे काही आहे ते त्यांच्या आणि प्रेक्षकांच्या विश्वासामुळेच."

पत्रकार: आजच्या पिढीला मार्गदर्शन करतांना आपण काय संदेश द्याल?

अल्ताफ शेख: युवकानी परिस्थिती न पाहता सद्यस्थिति वर लक्ष केंद्रित करुण यशवंत व्हावे!

एक अविस्मरणीय मुलाखत! गुगल सर्च करून बघू शकता:

**अल्ताफ दादासाहेब शेख - 8975303924.**

**कांताभाऊ राठोड**
**दैनिक सेवाशक्ती टाईम्स**

# 78 व्या वार्षिक निरंकारी संत समागमाची व्यापक पूर्वतयारी साठी बुलडाना जिल्ह्यातील

# खामगाव येथून व महाराष्ट्रातील हजारो स्वयंसेवक समर्पित करत आहेत त्यांच्या निष्काम सेवा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

खामगांव : 18 ऑक्टोबर 2025 रोजी संत निरंकारी मिशनचा 78 वा वार्षिक संत समागम, गतवर्षांच्या दिव्यता आणि गौरवशाली परंपरेशी सुसंगत राहून, या वर्षीही 31 ऑक्टोबर ते 3 नोव्हेंबर, 2025 दरम्यान संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा (हरियाणा) येथे अत्यंत भव्यरुपात, श्रद्धापूर्ण आणि आध्यात्मिक उत्साहात साजरा होणार आहे. हा दिव्य सोहळा सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पवित्र सान्निध्यात संपन्न होणार असून, या आनंदवार्तेने सर्व श्रद्धाळू भक्तांच्या अंतःकरणात अगणित हर्ष आणि आध्यात्मिक ऊर्जा संचारली आहे.या वर्षीचा वार्षिक समागम "आत्ममंथन" या विषयावर आधारित आहे. हा समागम म्हणजे भक्तांसाठी एक अद्धितीय अध्यात्मिक प्रवास आहे, जिथे ते ब्रह्म ज्ञानाच्या आत्मिक प्रकाशात सेवा, नामस्मरण आणि सत्सं गाच्या माध्यमातून आनंद व प्रेमाभक्तीचा अनुभव घेतील. या दिव्य उत्सवाची तयारी अत्यंत श्रद्धा, निष्ठा आणि निस्वार्थ भावनेने केली जात आहे. श्रद्धाळू भक्तगण वयस्कर असो वा युवा, पुरुष असो किंवा स्त्रिया सर्वजण मनोभावे सेवेत मग्न आहेत. समागम स्थळी पहाटेच्या पहिल्या किरणा पासून ते सायं काळच्या संध्या प्रकाशापर्यंत प्रत्येक ठिकाणी भक्तिभावाने समर्पित सेवेचे अलौकिक दृश्य दिसून येत आहे. इथे कोणी माती उचलत आहे, कोणी निवासी तंबू बांधत आहे, कोणी स्वच्छता करत आहे तर कोणी पाणी पुरवठा व



भोजन व्यवस्थेची सेवा पाहतो आहे. बुलडाना जिल्ह्यातील खाम गाव तसेच महाराष्ट्रातून हजारो स्वयं सेवक समागमाच्या पूर्वतयारी साठी आपल्या निष्काम सेवा समर्पित करत आहेत. 78 व्या वार्षिक संत समागमाची भव्यता दर्शवणारे मुख्य प्रवेशद्वारही आता आकार घेऊ लागले आहे, जे प्रेम, समरसता आणि आत्मिक एकत्वाच्या यात्रेचे प्रतीक ठरणार आहे. हे सर्व त्या समर्पण भावनेचे प्रमाण आहे, जी सतगुरुंच्या ज़ानातून उत्पन्न होते. जसे म्हटले गेले आहे, की "जिथे सेवेत समर्पण असते, तिथे प्रत्येक क्षण उत्सव बनतो." सेवाभावाच्या या अद्धितीय दृश्यात स्पष्टपणे जाणवते, की या सेवादारांच्या चेहऱ्यावर थकवा नव्हे, तर आनंद आणि उत्साहाचे तेज झळकत आहे. हा तोच दिव्य आनंद आहे, जो फक्त सतगुरुंच्या छत्रछायेत राहून सेवा आणि भक्तीच्या माध्य मातून अनुभवता येतो. सतगुरु माताजी सुद्धा नेहमी आपल्या प्रवचनांमधून प्रेरणा देतात, की "तन पवित्र सेवा केली, धन पवित्र दिले दान, मन पवित्र हरिभजनाने, त्रिविध होई कल्याण."समागमात केवळ देशाच्या कानाकोपऱ्यातूनच नव्हे, तर विदेशांतूनही लाखो श्रद्धाळू भक्तगण सहभागी होण्यासाठी येतात. त्यांच्या स्वागत आणि सुविधांसाठी सर्व आवश्यक व्यवस्था अत्यंत काटेकोर आणि नियोजनबद्ध पद्धतीने केली जात आहे. रेल्वे स्थानके, बस स्थानके आणि विमानत ळांवर निरंकारी सेवादलाचे अनुशासित व सुसज्जित सेवक आपल्या निळ्या व खाकी गणवेशात, श्रद्धाळूंचे आदरपूर्वक स्वागत करून त्यांना समागमस्थळी पोहोचवण्यासाठी सतत तत्पर राहतील.निःसंशयपणे, हा समागम केवळ एक साधारण धार्मिक कार्यक्रम नसून मानवतेच्या उत्थानाचा आणि समरसतेच्या जागृतीचा एक अनुपम उत्सव आहे जिथे विविध संस्कृती, भाषा आणि प्रांतातून आलेले श्रद्धाळू भक्तगण "वसुधैव कुटुंबकम्" या भावनेला आत्मसात करून, सतगुरुंच्या अमृतवाणीमधून आपले अंतःकरण प्रकाशमय करतील. या पवित्र प्रसंगी अशा सर्व सज्जन, सर्व समस्त बंधु-भगिनी यांचे मनःपूर्वक स्वागत आहे, जे प्रेम, शांती आणि समरसतेच्या या दिव्य महा यज्ञाचा भाग बनू इच्छितात.







**कॅमरा फ़ोकस**




विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेने उजळले शाळेचे प्रांगण,टाकाऊपासून टिकाऊ अशा कंदीलांनी सजला उत्सव मंगलमय।फलक लेखनात झळकला कलात्मकतेचा सुंदर आविष्कार,अंजनी बु. शाळेत दिवाळीचा आनंद दरवळला साऱ्याभर! जिल्हा परिषद शाळा अंजनी बु चे विद्यार्थी विवेक, अक्षरा ,भक्ती ,जोयायांनी रेखाटलेली फळ्यावर शुभ दीपावली चे सुंदर चित्र.
छायाचित्र - गजानन सरकटे.

दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831
Title code :- MAHMAR52107

# कुऱ्हाडी ग्रामपंचायतीत दिवाळीपूर्वी 'समृद्ध पंचायतराज' अभियानांतर्गत गाव स्वच्छतेचा संकल्प

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पथदिवे बसवून गाव स्वच्छतेचा उपक्रम राबविला; सरपंच सौ.रामकोर राठोड यांचे मार्गदर्शन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**




जिंतूर : तालुक्यातील कुऱ्हाडी ग्रामपंचायतीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत दिवाळी पूर्वी गाव स्वच्छ व सुंदर करण्याचा संकल्प ग्रामस्थांनी केला आहे. या अभियानांतर्गत ग्राम पंचायतीत पथदिवे बस विण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून, स्वच्छता मोहीम राबवून गाव स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. या उपक्रमा दरम्यान ग्रामपंचायत सरपंच सौ. रामकोर गोविंद राठोड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "गाव स्वच्छ, सुंदर आणि प्लास्टिक मुक्त ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. दिवाळीचा आनंद स्वच्छ वाता वरणातच खऱ्या अर्थाने साजरा करता येतो." स्वच्छता मोहिमेत अंगणवाडी सेविका सुमनबाई राठोड, भारती व्हावळे तसेच मदतनीस रामकोट चाफे, द्वारका बाई काळे, शालुबाई चाफे, शारदा बाई चाफे, लताबाई राठोड, चांगुना बाई जाधव, जनाबाई राठोड, पुण्यर्ता डाखोरे, तारामती चव्हाण, समाबाई गायकवाड, शांताबाई चिरमाडे, अनिता राठोड, शांता बाई आडे, कमलबाई राठोड यांचा सहभाग होता. तसेच पाणीपुरवठा कर्मचारी विकास वाकळे, समन्वय सदस्य संतोष राठोड आदींनीही सक्रिय सहभाग घेतला. गावातील प्रत्येक वार्डा मध्ये स्वच्छतेबाबत 'कॉर्नर बैठकां'चे आयोजन करून ग्रामस्थांना जनजागृती करण्यात आली. या उपक्रमामुळे गावकऱ्यां मध्ये स्वच्छते बाबत उत्साह आणि जबाबदारीची भावना निर्माण झाली असून दिवाळीपूर्वी संपूर्ण गावात स्वच्छतेचा आणि उजेडाचा माहोल निर्माण झाला आहे.

> **- सरपंच सौ. रामकोर गोविंद राठोड!**
> **"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे फक्त विकासाचे नव्हे, तर स्वच्छतेचे आणि जनजागृतीचेही अभियान आहे. कुऱ्हाडी ग्रामपंचायतीत आम्ही दिवाळीपूर्वी गाव स्वच्छतेचा आणि उजेडाचा संकल्प केला आहे. प्रत्येक नागरिकाने आपले घर, आपला परिसर स्वच्छ ठेवला तर संपूर्ण गाव सुंदर दिसेल. प्लास्टिकमुक्त गाव हा आमचा पुढील टप्पा आहे. ग्रामस्थांचा सहभाग आणि सहकार्यामुळे हे अभियान यशस्वीपणे पार पडत आहे. स्वच्छ, प्रकाशमान आणि आदर्श कुऱ्हाडी हेच आमचे ध्येय आहे."**

# जि.प.उच्च प्राथमिक शाळा,अंजनी बु.येथे आकाश कंदील बनवण्याची कार्यशाळा संपन्न

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**




अंजनी बु : दि. 16 ऑक्टोबर 2025 रोजी जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा अंजनी बु. येथे आकाश कंदील बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आले शाळेचे कार्यानुभवशिक्षक श्री प्रमोद ताजणे सर यांनी विविध प्रकारे टाकाऊ पासून टिकाऊ पद्धतीने आकाश कंदील कसे बनवायचे याबाबत सर्व उपस्थित विद्या र्थ्यांना प्रात्यक्षिक करून दाख वले. तसेच ड्रॉइंग टीचर श्री. गणेश चहारे सर यांनी दीपावली संदर्भात विद्यार्थ्यांना फलक लेखन कसे करावे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व त्यांच्याकडून दिवाळी संदर्भाने उत्कृष्ट पद्धतीने फलक लेखन करून घेतले. कार्यक्रमाला मुख्याध्या पिका कु. विजया जगधने मगर मॅडम, सहाय्यक शिक्षक सर्वश्री संजय बुरकुल सर ,शाम नगरकर सर, बळीराम आल्हाट सर, सुनील मगर सर ,अमोल केशेवार सर, माधव देशमुख सर ,कु. स्मिता शिंदे मॅडम, कु. जयश्री राजनगावकर मॅडम, श्री हेमंत देशमुख सर, कु. गायत्री खालकोणीकर मॅडम,कु. सुप्रिया हंबर्डे मॅडम, श्री सुमित शिंदे सर, कु. मयुरी तांबेकर मॅडम तसेच शारीरिक शिक्षण निदेशक श्री विष्णू फूके सर इत्यादींनी कार्य क्रमाच्या यशस्वीते साठी अथक परिश्रम घेतले. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# प्रत्येकाने घरोघरी गाय पाळली पाहिजे हीच खरी वसुबारस साजरी

## होईल राष्ट्रीय गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहेमद अन्सारी.**

परभणी : गौरक्षक सेना संचलित कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने आश्विन कृष्ण द्वादशीस वसुबारस साजरी केले जाते गोवत्स द्वादशी म्हणजे गाई गुरांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस वसु म्हणजे द्रव्य अर्थात धन त्यासाठी असलेले बारस म्हणजे द्वादशी म्हणून या दिवसाला गोवत्स द्वादशी असे म्हणतात हिंदू संस्कृत धर्मात गाईला महत्त्वाचे स्थान असून तिचा सन्मान करण्याचा हा दिवस या दिवशी गायीच्या पाडसासह पूजा करतात वसुबारस दिवाळीचा पहिला दिवसाला सुरुवात होते प्रत्येकाने घरोघरी गोमातेची राज्य सरकारने राष्ट्र राजमाता गोमाता दर्जा दिलेला आहे त्याला प्रतिसाद म्हणून प्रत्येक नागरिक हे पुराणा पासूनच करत आहे गाईला या दिवशी साडीचा भात भाकर गुळ चा निवेद दिला पाहिजे परंपरा आहे हे आपली संस्कृती जपली पाहिजे कोमातेची पूजा आरती कामधेनु आरती तुमचा महिमा किती वर्ण आरती मोक्षधेनु धृ । गायीचे चरणा तीर्थ ब्रह्मा विष्णू महेश्वर म्हणुन वं दिले यथार्थ शोडषोपचारी मंत्र नमियेला भगवंत आरती कामधेनू तुझी सोनियाची शिंगे त्याला रुपियाचे खुर पुच्छ



तुझे वाहे गंगा पाप जाईल हो दुर आरती कामधेनू विठोबा रखुमाई दोघे गाई आणि येला वळवुनी दूध जे काढीयेलं दिलं रुखमाई करी आरती कामधेनु म्हणून आपणही गोमातेची सेवा अर्ज केली पाहिजे प्रत्येकाने कमीत कमी वर्षातून पोळा गोपष्टमी वसुबारस या तीन काळामध्ये का होईना दररोज गाईला एक कमीत कमी एक तरी निवेद्य पोळी भाकर गुळ चारली पाहिजे काही आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे गाईचे गोमूत्र गाईचे शेण गाईचे दूध दही ताक तूप तुमच्या पासून बनवलेले अनेक पदार्थ आपल्याला आरोग्यासाठी चांगले व निसर्ग बिना केमिकल चे उपल होऊ शकतात म्हणून प्रत्येकाने घरोघरी गाय पाळा व गाईची सेवा करा हीच खरी वसुबारस साजरी होईल भगवा चौक वसमत रोड परभणी येथे गोमातेचे पूजन सोहळा संपन्न झाला याप्रसंगी गौरक्षक सेना संघटन जनसंपर्क महामंत्री गोसेवक नितीन जाधव गोगल गावकर, गौभक्त रुद्राक्ष आवटे रितेश पाटील सह गौभक्त उपस्थित होते अशी माहिती कै. छगन आप्पा जाधव गोसंवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट संचालक गौरक्षक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकाद्वारे माहिती दिली

# मुक्ताबाई अवसरमोल जिल्हा परिषदेसाठी सज्ज

**सेवाशक्ती टाईम्स.**
**कार्यालय प्रतिनिधी**



सिंदखेडराजा : आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत सामाजिक कार्यकर्त्या मुक्ताबाई अवसर मोल ह्या दुसरबिड जिल्हा परिषद रिंगणात उतरार आहेत. त्यांच्या उमेदवारी मुळे स्थानिक राज कारणात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे. मुक्ताबाई अवसर मोल या गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून, महिलांच्या सक्षमीकरणा साठी त्यांनी विविध उपक्रम राबवले आहेत. गाव पातळी वरील प्रश्न, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षण या विषयांवर त्यांनी सातत्याने पाठ पुरावा केल्यामुळे त्यांना स्थानिकां मध्ये चांगला जनाधार आहे." जनतेच्या प्रश्नांवर कोण त्याही पक्षाच्या चौकटीत न बसता थेट जनतेचा आवाज व्हायचं आहे," असे मुक्ताबाई अवसरमोल यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.त्यांच्या या निर्णयामुळे पारंपरिक पक्षीय उमेदवारांसमोर एक नवे आव्हान उभे राहणार आहे. गावोगाव भेटी, जनसंपर्क मोहिमा आणि महिला मतदारांशी संवाद अशा उपक्रमांद्वारे त्य जनसंपर्कात आहेत. स्थानिक राजकीय वर्तुळात त्यांच्या उमेदवारीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सौ.शिल्पा आठल्ये यांच्या स्वरांनी सजली बारामतीकरांची दिवाळी पहाट

## दयोदय गोशाळेत गायींच्या पूजनाबरोबर स्वरांची बरसात रसिकांचा उदंड प्रतिसाद

## दयोदय गोशाळा विविध उपक्रम राबवून जपत आहे सामाजिक बांधिलकी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**




बारामती : दिवाळी निमित्ताने महाराष्ट्रभर फराळ आणि फटाक्यां बरोबर स्वरांची दिवाळी साजरी करण्यात येत असतानाच बारामती येथे रसिकांसाठी प्रति वर्षा प्रमाणे याहीवर्षी चंदुकाका सराफ प्रायोजीत "दयोदय" गोशाळेत पहाटे निसर्गाच्या सान्निध्यात गोमातेच पूजन करून दिवाळी पहाटच्या भक्तीमय सुरांना सुरुवात झाली. सुरुवा तीला शास्त्रीय संगीताची शंभो गिरिजापत बंदीश गायली त्या नंतर उपस्थित रसिकांना भक्ती संगीत त्यामध्ये वाजे मृदुंग टाळ वीणा,गाई गोपाळ यमुनेच्या तीरी,वृंदावनी वेणू, वद जाऊ कुणाला शरण,कानडा राजा पंढरीचा. भाग्यदा लक्ष्मी बारम्मा, अप्रतिम अभंग आणि भावगीत गात उलट्या नामे तरला वाल्या या भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली.त्यांना तितकीच सुंदर साथ संगत हार्मोनियम आबा साहेब परकाळे, तबला आदी नाथ कुटे पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे टाळ जावेद शेख निवेदन अमृता गावडे यांनी करत कार्य क्रमाला रंगत आणली. यावेळी बारामती येथील विविध क्षेत्रात उल्ले खनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिंचा तसेच गोसेवकांचा सन्मान सोहळा आणि लाठी काठी, तसेच तलवारबाजी मुलांचे प्रात्यक्षिक संपन्न झाले.दयोदय ही स्सथा अनेक वर्षांपासून सामाजिक बांधिलकी म्हणून वेगवेगळे उप क्रम राबवत असताना सर्व बारामती करांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. यावेळी जाणकार श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बारामती करांसाठी ही मैफिल अविस्म रणीय ठरली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दयोदय गोशाळेचे सिद्धार्थ शहा, सौ. संगीता शहा, विश्वस्त आणि सचिव बाळकृष्ण कुलकर्णी काका आणि सर्व समस्त सहकारी आणि गोसेवक यांनी अधिक परिश्रम घेतले.

# दिव्यात शिवशक्ती रिक्षा युनियन कडून रिक्षा चालकांना जीवनांवश्यक वस्तूचे वाटप

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अमित जाधव.**



ठाणे : दिव्यात शिवशक्ती रिक्षा युनियनच्या वतीने यंदा रिक्षा चालक मालक यांना जीवना वश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले व दीपावलीच्या शुभेच्छा देऊन अध्यक्ष विनोद भगत व श्रीराम भगत यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. शिवशक्ती रिक्षा युनियनच्या वतीने दरवर्षी रिक्षा चालक व मालक यांच्या साठी अनेक उपक्रम राबविले जातात तसेच रिक्षा चालकांच्या आरोग्याची देखील काळजी घेत युनियनच्या माध्य मातून आरोग्य शिबीरे व इतर तपा सण्याचे आयोजन करण्यात येते. दिवा शहरातील रिक्षा चालक हा कधीही एकाकी पडणार नाही व युनियन नेहमी त्यांच्या पाठीशी उभी राहिली असून युनियनच्या माध्यमातून त्यांना अनेक संधी भविष्यात उपल करून देण्याचा आमचा मानस आहे असे अध्यक्ष विनोद भगत यांनी बोलताना स्पष्ट केले. प्रसंगी शिवशक्ती रिक्षा युनियनचे खजिनदार प्रवीण बार्शीकर, श्रीराम भगत तसेच शेकडो रिक्षा चालक व मालक उपस्थित होते.

# ईसाफ को-ऑपरेटिव्ह तर्फे स्वच्छता अभियान कार्यक्रम संपन्न

**सेवाशक्ती टाईम्स.**
**दिपक जैस्वाल.**

भोकरदन : जालना जिल्ह्यातील भोकरदन शहरात आज दिनांक: १७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजताईसाफ को-ऑपरेटिव्ह तर्फे जय भवानी नगर, भोकरदन येथे स्वच्छता अभियान कार्यक्रम उत्साह पूर्ण वातावरणात यशस्वी पणे संपन्न झाला.या कार्य क्रमास श्री. धनंजय सोनकर (सी.एच.) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. एकूण ३५ सहभागी या कार्यक्रमात सहभागी झाले होते, ज्यामध्ये जय भवानी संगम, नूतन कॉलनी संगम तसेच परिसरा तील अनेक महिला व मुले सहभागी झाली होती.श्री. सदानंद गरड (एस.आय. डी. एम.) यांनी उपस्थितांना स्वच्छ तेचे महत्त्व, आरोग्य, पर्यावरण जागरूकता, वैयक्तिक स्वच्छता आणि दैनंदिन जीवनात स्वच्छ परिसर राखण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले.श्रीमती मंगलबाई तेलंग्रे (समाज



सेविका) यांनी महिलांना उद्देशून एकजुटीचे व स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. जागरूकता सत्रा नंतर सर्व सह भागींनी परिसरातील साफस फाईत उत्साहाने भाग घेतला. झाडलोट, कचरा व्यवस्थापन आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे प्रत्यक्ष कार्य करण्यात आले. तसेच या उपक्रमांतर्गत भोकरदन शाखेची साफसफाई सर्व शाखा कर्मचारी यांनी केली.कार्यक्रमाच्या शेवटी श्री. समाधान उघडे (शाखा व्यव स्थापक) यांनी सर्व महिला, मुले आणि मान्यवरांचे आभार मानत कार्यक्रमाचा समारोप केला.हा कार्यक्रम श्री. संतोष धनवई (ए. बी. एम.) आणि श्री. महेश भोळे (ए. बी. एम.) यांच्या प्रयत्नां मुळे ईसाफ को-ऑपरेटिव्ह च्या मार्गदर्शना खाली यशस्वी रीत्या पार पडली.

# दिवाळीत मुंब्रा पो.स्टे.चा नागरिकांना जागरूकतेचा संदेश

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अमित जाधव.**



ठाणे : ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या मार्गदर्शना खाली मुंब्रा पोलीस स्टेशनने दिवाळी निमित्त कंदील आणि दिव्यांच्या माध्यमातून नागरिकां पर्यंत जागरूकतेचा संदेश पोहोच वण्याचा अद्वितीय उपक्रम राबवला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांच्या नेतृत्वाखाली 'ठाणे जिल्हा कायद्याचा बाले किल्ला', 'निर्भय ठाणे', 'नशा मुक्त ठाणे', 'बॅनर मुक्त ठाणे' प्रदूषण मुक्त ठाणे अशा संदेशांनी शहरात दिवे लावले जात असून नागरिकांनी या मोहिमेचे उत्साहाने स्वागत केले आहे आणि यामुळे पोलिस व नागरिक यांच्यातील संबंध अधिक दृढ झाले असून मुंब्रा पोलीस स्टेशन ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील उत्कृष्ट पोलीस स्टेशन ठरत आहे. नागरिकांना कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, सुरक्षिततेसाठी नियम पाळावेत, महिला व मुलांची सुरक्षा सुनिश्चित करावी, सार्वजनिक स्वच्छता राखावी, वाहतूक नियमांचे पालन करावे, सण साजरे करताना जबाबदारीने वर्तन करावे, अपघात व गुन्हे टाळावेत, फटाके व धुमधडाका टाळावां, मदत हवी असल्यास पोलिसांशी थेट संपर्क साधावा, नशा वादळापासून दूर राहावे, तरुणांनी योग्य मार्गदर्शन स्वीकारावे, स्थानिक समुदायासह एकत्र येऊन सुरक्षित सण साजरे करावे, तसेच पोलिसांच्या सूचना गांभीर्याने पाळल्यास सण आनंदात आणि सुरक्षिततेत साजरे होतील आणि मुंब्रा पोलीस स्टेशनच्या सततच्या उत्कृष्ट कार्यामुळे नागरिकां मध्ये कायद्याविषयी जागरुकता वाढली आहे आणि ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम इतर पोलीस स्टेशनसाठी आदश ठरत आहे.

# आ.सई ताई डहाके यांच्या प्रयत्नांना यश

## अकोला परिवहन विभागाच्या बिंदू नामावलीचा रखडलेला विषय मार्गी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**योगेश उपाध्ये.**

कारंजा लाड : मागील ५-६ वर्षांपासून राज्य परिवहन महा मंडळाच्या अकोला विभागाची बिंदू नामावली अद्यावत नसल्यामुळे अधिकारी कर्मचारी यांच्या भरती प्रक्रिया पदोन्नती तसेच बदली यामध्ये अडचणी येत होत्या. त्या सोडविण्यासाठी वाशिम जिल्ह्यातील कारंजा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सईताई डहाके यांनी पत्रव्यवहाराच्या माध्यमातून थेट राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार चंद्रशेखरजी बावनकुळे यांना साकडे घातले होते. त्यास अनुसरुन गुरुवार दिनांक 16 ऑक्टोबर रोजी मंत्रालय मुंबई येथे आमदार चंद्रशेखर बावन कुळे यांच्या दालनात तसेच राज्याचे परिवहन मंत्री नामदार प्रतापराव सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीमुळे मागील अनेक वर्षे रखडून पडलेल्या राज्य परिवहन महा मंडळाच्या अकोला विभागातील बिंदू नामावालीच्या प्रश्नावर आ. सईताई डहाके यांनी बिंदू नामावली यादी अद्यावत करण्या बाबत सातत्याने लावून धरलेल्या मागणीला आज यश आले. आ.सई ताईच्या आग्रहा खातर ना. चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री महसूल यांचे दालनामध्ये ना. प्रतापजी सरनाईक मंत्री परिवहन यांचे अध्यक्षतेखाली व राज्य परिवहन महा मंडळाच्या वरिष्ठ अधि काऱ्यांच्या उपस्थिती मध्ये मंत्रालयामध्ये या विषयावर बैठक पार पडली. महाराष्ट्र राज्य परिवहन महा मंडळाच्या अकोला विभा गातील कर्मचाऱ्यांची बिंदू



नामावली यादी अद्यावत नसल्या मुळे अनेक अधिकारी - कर्मचारी यांचा पदोन्नतीचा प्रश्न, बदली तसेच नवीन पदभरती व अनुकंपा भरती इत्यादि प्रश्न मार्गी लागत नसल्याच्या तक्रारी महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आ.सईताई डहाके यांचेमार्फत शासनाकडे केलेल्या होत्या. तसेच राज्य परिवहन विभागाच्या इतर अनेक समस्यां विषयी आ.सईताई आग्रही होत्या. या प्रश्नांविषयी त्यांनी वेळोवेळी शासनाकडे पत्रव्यवहार केला होता. तसेच संबंधित मंत्री व वरिष्ठ अधिकारी यांच्या गाठीभेटी घेवून या प्रश्नाला न्याय मिळण्यासाठी प्रयत्न केले होते. त्याची शासनाने दखल घेवून गुरुवारी मंत्रालयामध्ये आ. सईताई डहाके यांच्या उपस्थिती मध्ये महत्वाची बैठक पार पडली. राज्य परिवहन महा मंडळाच्या अकोला विभागातील ३० संवर्गापैकी जवळपास २६ संवर्गातील कर्मचाऱ्यांची बिंदू नामावली अद्यावत केल्याचे तसेच वाहक, चालक, कनिष्ठ लिपिक आणि वरिष्ठ लिपिक या उर्वरित ४ संवर्गातील अधिकारी - कर्मचारी यांची प्रवर्गनिहाय बिंदू नामावली अद्यावत करण्याची प्रक्रिया गतीने सुरु करण्यात आली असून लवकरच ती अद्यावत करण्यात येईल, असे राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले. या बैठकीला राज्य परिवहन महामंडळाच्या अकोला विभागाचे विभाग नियंत्रक श्री विलास राठोड, तसेच महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेचे कर्मचारी, पदाधिकारी उपस्थित होते. आ.सईताई डहाके यांनी आमच्या प्रश्नाला वाचा फोडली याबद्दल त्यांनी सईताई यांचे आभार मानले. आ. सईताई डहाके यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या इतर अनेक समस्यावर तातडीने उपाय करण्यात येतील, असेही याबैठकी मध्ये अधिकाऱ्यां कडून सांगण्यात आले.

# संभाजीनगर शहर पोलीसानी केला 77 लाख 44 हजार रुपयांचा माल जप्त!

## संभाजीनगर शहर पोलिसांची दमदार कामगिरी?

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

संभाजीनगर : संभाजीनगर येथे अमली पदार्थ साठा पुरवणाऱ्या बाहेर राज्यातील टोळीचा प्रभास अटक आरोपीकडून नशेसाठी वापरले जाणाऱ्या कोडी शेड्स च्या 18.360 हॉटेल लोडिंग कार मोबाईल हँडसेट असा एकूण 77 लाख 44 हजार रुपये मुद्देमाल जप्त. मा. श्री प्रवीण पवार पोलीस आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांनी पदभार घेतल्यापासून छत्रपती संभाजी नगर शहरात अमली पदार्थ विक्री वितरण व्यापार विरोधात कारवाई करण्याबाबत सर्व पोलीस स्टेशन व गुन्हे शाखा ए एन सी यांना वेळोवेळी आदेश केले होते. त्या अनुसरून सन 2025 मध्ये छत्रपती संभाजी नगर शहर पोलीस दलातील विविध पोलीस स्टेशन गुन्हे शाखा व अमली पदार्थ प्रतिबंधक पथक यांचे कडून एकूण 260 गुन्हे एन डी पी एस कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये एकूण 400 आरोपी अटक करत त्यात किमत रुपये 2. 37. 53. 846 / च्या मुली पदार्थ अंतर्भूत गांजा चरस नशे करिता वापरणार जाणारे औषधी गोळ्या व सिरप असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमोद कारवाई मध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या तपास प्राप्त करण्यात आलेले गोपनीय माहिती इत्यादी वापरण्यासाठी अभ्यास करून माननीय पोलीस आयुक्त यांनी वेळोवेळी विशिष्ट पथकांना जबाबदारी देऊन शहरातील अमली पदार्थ विक्री' पुरवठा वितरण इत्यादीचे सम समूह उच्चारण करण्या साठी आरा खडा तयार करण्यात आला. या आधारे प्राप्त गोपनीय माहिती वरून मागील महिन्या मध्ये दि 12 / 09 / 2025 रोजी पोलीस ठाणे वाळूज अंतर्गत दाखल गुन्ह्यां मध्ये छाप कारवाई करून राईट कंपनीचे कोडींग घटक असलेले औषधे द्रव्याच्या एकूण 25 झिरो चार बाटल्या व इतर मुद्देमाल असा एकूण 12.43.200. त्याचा जप्त करून एकूण विक्री साठा व वितरण यामध्ये सहभागी



असलेले संघटित नेटवर्क मधील 41 आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे वाळूज येथे गु. र. न. 279.2025 कलाम 8(क)21(क)25.27.29 एडीपीस कायदा महत्व प्रभावी कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर गुन्हे शाखेच्या बद काला मिळालेल्या माहिती वरुन दिनांक 09/10/2025 रोजी आरोपी 1) कल्पेश चंदुलाल अग्रवाल वय 38 वर्ष व्यवसाय नोकरी राहणार पद्माकर नगर साखरे रोड धुळे छत्रपती संभाजीनगर 2) सय्यद नबी सय्यद लाल वय 37 वर्ष व्यवसाय खाजगी नोकरी राहणार जोगेश्वरी एमआयडीसी वाळू छत्रपती संभाजीनगर )3 ज़ानेश्वर महादेव यादव उर्फ माऊली राणा जय भवानी नगर छत्रपती यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे बेगमपुरा गु. र. न. 248 / 225 कलम 128 ऑब्लिक 278 सह कलम (क)22)अ29 एन डी पी एस प्रमाणे गुन्हा दाखल करून तपास अधिकारी श्री रविकांत गप्पी सहाय्यक पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा यांनी झिरो दोन आरोपींना गुन्ह्यात अटक केली धुळे येथील आरोपी कल्पेश अग्रवाल यास मध्य प्रदेश राज्यातील इंदोर येथील दुर्गेश सिताराम राऊत वय 54 राणा 233 सूर्य असतो आपारमेंट 32 भंडारी मार्ग इंदोर मध्ये व गुजरात राज्याची धर्मेश उर्फ गोपाल गेम चेंज प्रजापती वय 22 सरांना 39 स्नेहदीप सोसायटी बेलपूर पोलीस चौकीजवळ अहमदाबाद गुजरात कोर्डिंग शिफारस साठा पुरवण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले माननीय पोलीस आयुक्त यांचे आदेशात नव्हे गुन्हे शाखेच्या टीम टीम धुळे इंदोर मध्य प्रदेश व आमदाबाद गुजरात येथे वेगळ्या वेगळ्या ठिकाणी जाऊन धुळे व इंदोर येथून नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या कोर्डिंग शिरा च्या एकूण 18360 बॉटल जप्त केले व दुर्गेश सिताराम राऊत व 54 राहणार 2203 श्रीवल्लभ आपारमेंट 32 आदेश भंडारी मार्ग इंदोर धर्मेंद्र उर्फ गोपाल गेमचेंड प्रजापती वय 32 सरांना 39 सोसायटी बेजनपूर पोलीस चौकी येथून अटक करून गुजराती यांना सोपवण्यात आले गुजरात अटक करून माननीय न्यायालयात हजर केले असता दोषीआरोपींना २१/१०-२०२५ पीसीआर मंजूर केलेला असून गुन्ह्याचे सखोल तपास सुरु आहे.

# चिरांगन अस्सल वऱ्हाडी दिवाळी अंकाचे मोठ्या थाटामाटात प्रकाशन

## अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंचाचा अभिनव उपक्रम

## सलग आठ वऱ्हाडी दिवाळी अंक प्रकाशित

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

अकोला : मराठी भाषेतील वऱ्हाडी बोलीभाषेतल्या एकमेव अस्सल वऱ्हाडी दिवाळी अंक चिरांगनचे अकोल्यात मोठ्या थाटामाटात प्रकाशन पार पडले. बार्शीटाकळी येथील वऱ्हाडी साहित्य व बोलीभाषा संवर्धन संस्था द्वारा संचालीत अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंच अकोला यांनी वऱ्हाडी बोली भाषा व संस्कृतीचे संवर्धन व्हावे, वऱ्हाडी बोली भाषा जतन व्हावी, तिचा प्रचार व प्रसार करून ती शिक्षणाची व व्यवहाराची भाषा व्हावी हा उद्देश पुढे ठेऊन काम करत असते. आतापर्यंत ह्या साहित्यिक संस्थेचे एकूण ६ वऱ्हाडी साहित्य संमेलन व आतापर्यंत सलग ७अस्सल वऱ्हाडी दिवाळी अंकाचे प्रकाशन केले. यंदाचे हे आठवे वर्ष असून यावर्षी चिरां गनच्या ८ व्या अंकाचे प्रकाशन अको ल्यातील, कौलखेड भागात असलेल्या गणेश मानव सेवा समितीच्या सभा गृहात, दि. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी मान्य वरांच्या हस्ते मोठ्या थाटा माटात पार पडले. या वेळी दैनिक पुण्यनगरीचे अकोला आवृत्ती संपादक व ख्यातनाम गझलकार संजय खांडेकर अध्यक्षस्थानी होते. तर प्रमुख उपस्थितीत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरा




वतीच्या आचार्य पदवी समिति सदस्या, प्रा. ममता इंगोले, ज्येष्ठ साहित्यिक तुळशीराम बोबडे, हास्यकवी किशोर बळी, प्रा. सदाशिव शेळके, सांस्कृतिक मंडळाचे माजी सदस्य पुष्पराज गावंडे, अंकुर साहित्य संघाचे केंद्रीय अध्यक्ष हिम्मत ढाळे हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. निकिता नराजे तर आभार अजय इंगळे यांनी मानले. सदर अंक पूर्णत्वास जाण्यासाठी संस्थेच्या सभास दांनी अथक परिश्रम घेतले. ह्या प्रकाशन सोहळ्यात चिरांगन २०२५ मुखपृष्ठ नायक नायिका श्री अन् सौ. चेडे यायच्या संगच मुखपृष्ठ नायिका २०१९ वैशाली बल कार, मुखपृष्ठ नायिका २०२२ साधना ताई काळबांडे आंगोनीनं हजर होते. अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंच अकोलाचे गोपाल भालतीलक, देविदास वाघ, चक्रधर थोरात ,नितीन वरणकर, दीपक सरप, श्रीराम वाघ, विनायक काळे, उषाताई भोपळे, वनिताताई गावंडे, शालीनी बेलसरे, अ. भा. व. सा. मं. अध्यक्ष श्याम ठक, उपाध्यक्ष निलेश कवडे,कोअर कमीटी सदस्य निलेश देवकर, प्रविण सोनोने, संजय वाट, अजय इंगळे, विद्याताई बनाफर, अलका बोर्डे, विद्या राणे, तन्वी वाघ, सागर लोडम, अरुण भाऊ मोडक, राजा देशमुख, धीरज चावरे, अमोल गोंडचवर, राजेश काटोले, चंद्रशेखर भुयार, रामराव पाटेखेडे, प्रा, मोहन काळे, सुर्यकांत शास्त्री, विशाल कुलट हे अवघे उपस्थित होते .

# शेगाव प्रभाग क्रमांक १५-ब मध्ये समाजसेवक

## श्री.उमेश सुरेशराव राजगुरे यांना जाहीर पाठिंबा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**देवचंद्र समदूर.**

शेगाव : शेगाव शहरातील प्रभाग क्रमांक १५-ब मध्ये समाज सेवक श्री. उमेश सुरेशराव राजगुरे यांना नागरिकांचा वाढता पाठिंबा लाभत असून, त्यांच्या प्रत्येक कॉर्नर मीटिंगला आणि गल्लोगल्ली होणाऱ्या संवादांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. समाज कारणातील त्यांच्या सातत्य पूर्ण व निस्वार्थी कार्या मुळे विविध समाज घटकांमधून



त्यांच्याबद्दल प्रचंड उत्साह आणि विश्वास दिसून येत आहे. स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी त्यांची तत्परता आणि सर्वसमा वेशक दृष्टिकोन यामुळे नागरिकांचा विश्वास अधिकच दृढ होत आहे. प्रसार माध्यमानी समाजसेवक उमेश राजगुरे यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी नम्रपणे सांगितले की -"पक्षश्रेष्ठ जे ठरवतील तेच मला मान्य असेल. मी सदैव समाज आणि पक्ष या दोघांच्या विश्वासास पात्र राहण्याचा प्रयत्न करीन."त्यांच्या या विनम्र भूमिकेमुळे आणि लोकाभिमुख कार्यामुळे प्रभाग क्रमांक १५-ब मध्ये उमेश राजगुरे यांचा जनाधार दिवसेंदिवस वाढताना स्पष्टपणे जाणवत आहे.

# विद्यार्थ्यांचे शिक्षणात खंड पडू नये म्हणून

## दिवाळी सुट्टी मध्ये नोटबुक वाटप

**सेवाशक्ती टाईम्स.**
**संदीप राठोड.**

खामगांव : तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा जयराम गड येथील शाळेत नवनियुक्त बदली होऊन आलेले शिक्षक श्री काळे सर यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना दिवा ळीच्या सुट्टी मध्ये शिक्षणाचा खंड पडू नये म्हणून स्वखर्चाने विद्यार्थ्यांना नोटबुक वाटप केले. शाळेला दिवाळी निमित्त दीर्घ सुट्टी असल्या मुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू



नये म्हणून अक्षर लेखन, गणितीय क्रिया तसेच इंग्रजी लेखना साठी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना नोटबुक चे वाटप करण्यात आले. त्याप्रसंगी उपस्थितां मध्ये सरपंच पती सुनील जाधव, उपसरपंच सुनील ठक, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष राहुल राठोड, रोहिदास जाधव, तसेच शिक्षक काळे सर रेखा भुमरे मॅडम तसेच पालक वग उपस्थित होते.

# एम.ई.एस.कला व वाणिज्य महाविद्यालय मेहकर येथे वाचन

## प्रेरणा दिन निमित्त सामूहिक वाचनाचे आयोजन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

मेहकर : एम. ई. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय मेहकर येथे दि. 15 ऑक्टोबर 2025 रोजी भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती भारतरत्न, महान वैज्ञानिक, मिसाईल मॅन डॉ ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. महाविद्या लयत दरवर्षी सदर कार्य क्रमाचे आयोजन ग्रंथालय विभागातर्फे करण्यात येते. कार्यक्रमाच्या सुरुवा तीला भारतरत्न डॉ ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रेरणा दायी कार्य क्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय दांदडे यांनी भूषविले तर प्रमुख वक्ते म्हणून महाविद्याल याचे



अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे सम न्वयक डॉ. गणेश सावजी उपस्थित होते. कार्य क्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय दांदडे यांनी विद्यार्थी दशेतील वाचनाचे महत्त्व व वाचनामुळे विद्यार्थ्यांचा होणारा सर्वांगीण विकास यावर सखोल मार्गदर्शन केले. कार्य क्रमाचे प्रमुख वक्ते I Q A C समन्वयक डॉ. गणेश सावजी यांनी भारतरत्न डॉ. ए. पि. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांनी जीवनात वाचनाला अधिक महत्त्व द्यावे, असे आव्हान केले. याप्रसंगी विद्यार्थ्याकडून सामूहिक वाचन करण्यात आले. तसेच, विद्यार्थ्यांनी या वेळी महाविद्या लयात उपल मुबलक वाचन साहित्याची पाहणी केली. सदर कार्य क्रमाचे सूत्र संचालन ग्रंथपाल डॉ. प्रविण जोशी तर आभार प्रदर्शन प्रा. सुशेन मैद यांनी केले. या कार्यक्रमांस महाविद्याल यातील बहुतांश विद्यार्थी हजर होते. तसेच, एम. ई. एस. फार्मसी महाविद्याल याचे सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

# विष्णू गायकवाड जिल्हा शिक्षक गौरव पुरस्काराने सन्मानित

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

मेहकर : गर्दे वाचनालय सभागृह बुलढाणा या ठिकाणी माजी राष्ट्रपती महामहीम डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम साहेब यांच्या जन्मदिनी दि. 15 ऑक्टोबर ला जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळा कारेगाव येथील उच्च श्रेणी मुख्या ध्यापक विष्णु भगवान गायकवाड यांना मुख्य कार्यपालन अधिकारी श्रीमान गुलाबराव खरात यांचे शुभ हस्ते सपत्नीक जिल्हा शिक्षक गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले .याप्रसंगी आमदार संजय गायकवाड,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार साहेब, शिक्षणाधिकारी विकास पाटील, तसेच विविध विभाग प्रमुख, गटशिक्षणा धिकारी श्रीमान कुंभारे, उमेश जैन व सर्व मान्यवर




व्यासपीठावर उपस्थित होते. विशेष म्हणजे विष्णू गायकवाड सर हे राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त श्रीमान भगवानराव गायकवाड यांचे चिरंजीव आहेत. हा पुरस्का राचा वारसा कायम ठेवल्या बाबतचा उल्लेख या प्रसंगी आवर्जून करण्यात आला. गट विकास अधिकारी देशमुख, ◌रीमान रवी मापारी, बी. आर. सी. कार्यालय लोणार येथील सर्व कर्मचारी, श्रीमान परमेश्वर गायकवाड श्रीमान गजानन गायकवाड, संजय डव्हळे भगवान राव खराटे, केंद्र प्रमुख सुनिल जाधव सर, भागवत गायकवाड, सौरभ गायकवाड, परिवारातील सर्व सदस्य, उच्च श्रेणी मुख्याध्यापक संघटनेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक संघटनांचे सर्व पदाधिकारी तसेच कारेगाव येथील सरपंच विश्वास केंधळे, ग्रामपंचायतचे सर्व सन्माननीय सदस्य शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री भागवतराव चव्हाण, शाळा व्यवस्थापन समितीचे सन्माननीय सर्व सदस्य. नातेवाईक, मित्र परिवार यांनी या सन्मानाबद्दल सरांचे अभिनंदन केले आहे.